**ग्राम पंचायतींनी त्यांच्या अखत्यारीतील मोकळ्या जागी बांधकामास परवानगी देण्यापूर्वी घ्यावयाच्या दक्षतेबाबत तसेच महाराष्ट्र ग्राम पंचायत (गावठाणाच्या विस्ताराची तत्वे आणि इमारतीचे नियमन) नियम, १९६७ मधील नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :- व्हीपीएम २००५/प्र.क्र.२४५/पंरा-३,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. दिनांक :- २२ ऑगस्ट, २००५.

## परिपत्रक

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, राज्यातील ग्राम पंचायतींकडून, त्यांच्या अखत्यारीतील मोकळ्या जागेवर इमारती बांधकाम करण्यास परवानगी देताना, महाराष्ट्र ग्राम पंचायत (गावठाणाच्या विस्ताराची तत्वे आणि इमारतीचे नियमन) नियम,१९६७ मधील बंधनकारक मानके पाळली जात नाहीत. ग्राम पंचायतीकडून फक्त बांधकाम परवानगी संबंधित व्यक्तीला दिली जाते. मात्र, अशा जमिनीवर संबंधित व्यक्तीचा निर्वेध हक्क आहे का ? जिल्हाधिकारी यांनी या भूखंडाकरिता अकृषिक परवानगी दिलेली आहे का ? इत्यादींची तपासणी त्यांच्याकडून केली जात नाही. त्यामुळे, अशी परिस्थिती निर्माण होते की, गांवातील मोकळ्या जागेवर मोठ-मोठया इमारती/ बंगले, इत्यादीचे बांधकाम केले जाते. मात्र, या नवीन वसाहतींकडे जाण्यासाठी योग्य रस्ते, सांडपाण्याची व्यवस्था, पाणी पुरवठा इ. ची कोणतीही व्यवस्था बांधकाम व्यावसायिकांकडून केली जात नाही. व तद्नंतर हा सर्व भार संबंधित ग्राम पंचायतीवर पडतो किंवा काही वेळा या सुविधा तेथील लोकप्रतिनिधीनी उपलब्ध करुन द्याव्यात, अशी रहिवाशाकडून मागणी होते. असे प्रकार विशेषत: मोठ्या शहराच्या/ नगरपालिकांलगत असलेल्या ग्राम पंचायतीमध्ये होत असतात. हे सर्व टाळणे अत्यंत आवश्यक आहे. सबब, या परिपत्रकाद्वारे शासन अशा सुचना देत आहे की, अर्जदारांकडून बांधकामासाठी परवानगी मागणारे अर्ज प्राप्त झाल्यावर आवश्यक माहिती घेऊन सर्व कागदपत्र उपलब्ध करुन दिल्यानंतरच ग्राम पंचायतीनी खालील बाबींची पूर्तता करुन बांधकामास परवानगी द्यावी.

१. ही परवानगी देताना वाहतुकीसाठी रस्ता, सांडपाण्याची व्यवस्था व पाणी पुरवठा व्यवस्था या मुलभूत सोईसुविधा उपलब्ध करुन देणे बंधनकारक करावे.

२. इमारत बांधकाम करावयाचा भूखंड गावठाण हद्दीत असल्यास आणि निवासा व्यतिरिक्त अन्य प्रयोजनाकरिता बांधकाम परवानगी आवश्यक असल्यास, गावठाणा व्यतिरिक्त अन्य क्षेत्राकरिता जिल्हाधिकाऱ्यांनी अकृषिक परवानगी दिलेली आहे काय,

३. इमारत बांधकाम करावयाचा भूखंड राष्ट्रीय महामार्ग, राज्य मार्ग तथा जिल्हा मार्ग यांच्या लगत असल्यास संबंधित प्राधिकरणाचे "ना हरकत प्रमाणपत्र" आहे काय,

४. इमारतीचे बांधकाम धार्मिक प्रयोजनार्थ असल्यास पोलीस विभागाचे " ना हरकत प्रमाणपत्र " घेतले आहे काय,

५. महाराष्ट्र ग्राम पंचायत (गावठाणाच्या विस्ताराची तत्वे आणि इमारतीचे नियमन) नियम, १९६७ मधील नियम-७ नुसार विहित केल्याप्रमाणे प्रस्तावित इमारत बांधकामाचा नकाशा.

६. अर्जदार हा अशा भूखंड तथा जमिनीचा निर्वेध हक्कदार असल्याबाबतचा वैध पुरावा, उदा. सात-बाराचा उतारा इत्यादी.

२. सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना असे कळविण्यात येते की, वरील सूचना आपल्या जिल्ह्यातील सर्व ग्राम पंचायतींच्या निदर्शनास आणून वरील अटींचे व नियमांचे पालन केले जाईल, याची खातरजमा करावी. याबाबत संबंधित पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी यांनीही वारंवार आढावा घेवून, ग्राम पंचायतींकडून माहिती घ्यावी व विहित नियमांचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घ्यावी. याचे उल्लंघन झाल्याची बाब आढळून आल्यास, सर्व संबंधितांवर त्वरेने शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची कार्यवाही करावी.

या आदेशांचे काटेकोरपणे अंमलबजावणी आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( कुंदा गोसावी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

(१) सर्व विभागीय आयुक्त,
(२) सर्व जिल्हाधिकारी,
(३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
(४) सर्व पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी,
(५) निवड नस्ती (कार्यासन क्रमांक पंरा-३),